# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

३० में, २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


## चंद्रपुर पोलीस व माउन्ट कारमेल कॉनवेंट चंद्रपुर यांचे संयुक्त विद्यमाने अतिदुर्गम भागातील महिलांसाठी आरोग्य जागृती कार्यक्रम

कोरोनाच्या या लढाईत संपुर्ण जग आपापल्या रितीने लढाई लढत आहे. कोरोना आजार आणि कोरोनाविरुध्दच्या लढाईत घ्यावयाची काळजीबाबत जागतीक आरोग्य संघटना, केंद्रशासन व राज्यशासन, आरोग्य विभाग, आयुष विभाग, प्रसारमाध्यमे व प्रशासनाकडुन विविध प्रकारे जाणिवजागृती करण्यात येते. प्रत्येकव्यक्ती या संकटातुन बाहेर पडावे म्हणुन मनोमन प्रार्थना करत आहे. कोरोना आजारासंबधी जाणिवजागृती करण्याचा व लॉकडाउनच्या काळात गरजुना लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तुची मदत करण्याचा प्रयत्न वेळोवेळी पोलीस विभागातर्फे करण्यात येत आहे. यातच एक छोटासा उपक्रम म्हणुन पोलीस अधीक्षक डॉ. श्री. महेश्वर रेडडी यांचे मार्गदर्शनात, पोलीस विभागातील महिला अधिकारी व कर्मचारी यांनी अतिदुर्गम भागातील महिलांना सॅनिटरी नॅपकीन वाटप करून केला आहे.

चंद्रपुर जिल्हयाला दोन राज्याच्या सिमा लागुण असुन आदिवासी समुदाय मोठया प्रमाणात आहे. आणि जिल्हयातील बहुतांश भाग हा अतिदुर्गम आहे. या अतिदुर्गम भागातील लहान लहान गावाला गुडा म्हणतात. या अतिदुर्गम भागात राहणाऱ्या महिला आणि किशोरवयीन मुलींमध्ये मासीक पाळी दरम्यान स्वच्छतेच्या पारंपारीक सवयी, समज-गैरसमज, अंधश्रध्दा आणि रुढीपरंपरेचा विचारधारा पाळतात. याबाबत प्रशासनाकडुन वारंवार जागृत करण्याच्या प्रयत्नसुध्दा झालेला आहे. काही महिला आताही मासिक पाळीच्या वेळेस कपडयाचा वापर करीत असुन ते अत्यंत घातक प्रकार असुन आरोग्यावर त्याचप्रमाणे किशोरवयीन मुलींच्या शिक्षणावर विपरीत होत असतो.

दिनांक २९/०५/२०२० रोजी चंद्रपुर पोलीस विभाग आणि माउन्ट कारमेल कॉनवेंट हायस्कुल चंद्रपुर यांनी मासिक पाळी वा प्रसुती झालेल्या महिलेबाबत असणारे जिवघेणे चुकीचे समज दुर करून महिलांना स्वत:च्या आरोग्याविषयी जाणीवजागृती करून सॅनिटरी नॅपकीन्सचा वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच अतिदुर्गम भागातील महिला व मुलींना सॅनिटरी नॅपकीन्सचे वाटप करण्याच्या उपक्रम सुरु केला आहे. पोलीस प्रशासनातर्फे हा एक छोटासा उपक्रम आणि याव्यतीरिक्त विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.

-------------------------------------------------------